# महाराष्ट्र शासन

## विविध पदांच्या भरतीसाठी ऑनलाइन परीक्षेसंबंधित माहिती पुस्तिका

उमेदवार देणार असलेल्या ऑन-लाईन परीक्षेच्या विविध पैलूंचा तपशील आणि संबंधित बाबीसंबंधात महत्वाच्या सूचना या पुस्तिकेत आहेत. परीक्षेची तयारी करण्यात मदत व्हावी म्हणून उमेदवारास या पुस्तिकेचे नीट अध्ययन करण्यास सुचविले जात आहे.

खाली दर्शविल्याप्रमाणे ऑन-लाईन परीक्षेत वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या बहुपर्यायी प्रश्नावल्या असतील.

**आरोग्य सेवक (पुरुष) 40% , आरोग्य सेवक (पुरुष) 50% (हंगामी फवारणी क्षेत्र कर्मचारी), आरोग्य परिचारिका/आरोग्य सेवक (महिला), कंत्राटी ग्रामसेवक, पशुधन पर्यवेक्षक, कनिष्ठ आरेखक, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक (बांधकाम/लघु पाटबंधारे) या पदांकरीता परीक्षेचे स्वरूप**

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | काठिण्य पातळी | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | अवधि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी भाषा | 10 वी इयत्ता | 15 | 30 | मराठी | 120 मिनिटे |
| 2 | इंग्रजी भाषा | 10 वी इयत्ता | 15 | 30 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | 10 वी इयत्ता | 15 | 30 | मराठी आणि इंग्रजी | |
| 4 | तर्कशक्ती आणि गणितीय क्षमता | 10 वी इयत्ता | 15 | 30 | | |
| 5 | तांत्रिक ज्ञानाची चाचणी | पदविका/पदवी स्तरावरील प्रश्न | 40 | 80 | | |
| | **एकूण** | | **100** | **200** | | 120 मिनिटे |

**आरोग्य पर्यवेक्षक, प्रयोगशाळा तंत्रज्ञ, वरिष्ठ सहाय्यक (लेखा), विस्तार अधिकारी (कृषी), विस्तार अधिकारी (शिक्षण) वर्ग 3 – श्रेणी 2, कनिष्ठ लेखा अधिकारी या पदांकरीता परीक्षेचे स्वरूप**

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | काठिण्य पातळी | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | अवधि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी भाषा | 12 वी इयत्ता | 15 | 30 | मराठी | 120 मिनिटे |
| 2 | इंग्रजी भाषा | 12 वी इयत्ता | 15 | 30 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | पदविका/पदवी स्तरावरील प्रश्न | 15 | 30 | मराठी आणि इंग्रजी | |
| 4 | तर्कशक्ती आणि गणितीय क्षमता | | | | | |
| 5 | तांत्रिक ज्ञानाची चाचणी | | 40 | 80 | | |
| | **एकूण** | | **100** | **200** | | 120 मिनिटे |

## प्रयोगशाळा तंत्रज्ञ या पदाकरीता परीक्षेचे स्वरूप

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | काठिण्य पातळी | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | अवधि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी भाषा | 12 वी इयत्ता | 15 | 30 | मराठी | 120 मिनिटे |
| 2 | इंग्रजी भाषा | 12 वी इयत्ता | 15 | 30 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | पदवी स्तरावरील प्रश्न | 15 | 30 | मराठी आणि इंग्रजी | |
| 4 | तर्कशक्ती आणि गणितीय क्षमता | | 15 | 30 | | |
| 5 | तांत्रिक ज्ञानाची चाचणी | | 40 | 80 | इंग्रजी | |
| | **एकूण** | | **100** | **200** | | 120 मिनिटे |

## कनिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ सहाय्यक (लेखा), रिगमन (दोरखंडवाला), लघुलेखक (निम्न श्रेणी), लघुलेखक (उच्च श्रेणी) या पदांकरीता परीक्षेचे स्वरूप

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | काठिण्य पातळी | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | अवधि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी भाषा | 10 वी इयत्ता | 25 | 50 | मराठी | 120 मिनिटे |
| 2 | इंग्रजी भाषा | 10 वी इयत्ता | 25 | 50 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | 10 वी इयत्ता | 25 | 50 | मराठी आणि इंग्रजी | |
| 4 | तर्कशक्ती आणि गणितीय क्षमता | 10 वी इयत्ता | 25 | 50 | | |
| | **एकूण** | | **100** | **200** | | 120 मिनिटे |

## मुख्य सेविका/पर्यवेक्षिका, वरिष्ठ सहाय्यक, विस्तार अधिकारी (पंचायत), विस्तार अधिकारी (सांख्यिकी) या पदांकरीता परीक्षेचे स्वरूप

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | काठिण्य पातळी | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | अवधि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी भाषा | 12 वी इयत्ता | 25 | 50 | मराठी | 120 मिनिटे |
| 2 | इंग्रजी भाषा | 12 वी इयत्ता | 25 | 50 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | पदवी | 25 | 50 | मराठी आणि इंग्रजी | |
| 4 | तर्कशक्ती आणि गणितीय क्षमता | पदवी | 25 | 50 | | |
| | **एकूण** | | **100** | **200** | | 120 मिनिटे |

## औषध निर्माण अधिकारी, कनिष्ठ अभियंता (यांत्रिकी), कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (बांधकाम/लघु पाटबंधारे), कनिष्ठ अभियंता (विद्युत) या पदांकरीता परीक्षेचे स्वरूप

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | काठिण्य पातळी | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | अवधि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | मराठी भाषा | 10 वी इयत्ता | 15 | 30 | मराठी | 120 मिनिटे |
| 2 | इंग्रजी भाषा | 10 वी इयत्ता | 15 | 30 | इंग्रजी | |
| 3 | सामान्य ज्ञान | 10 वी इयत्ता | 15 | 30 | मराठी आणि इंग्रजी | |
| 4 | तर्कशक्ती आणि गणितीय क्षमता | 10 वी इयत्ता | 15 | 30 | | |
| 5 | मराठी भाषा | पदविका/पदवी स्तरावरील प्रश्न | 40 | 80 | इंग्रजी | |
| | **एकूण** | | **100** | **200** | | 120 मिनिटे |

## जोडारी, कनिष्ठ यांत्रिकी, तारतंत्री और यांत्रिकी या पदांकरीता परीक्षेचे स्वरूप

| अनुक्रमांक | प्रश्नावलीचे नाव | काठिण्य पातळी | प्रश्न संख्या | अधिकतम अंक | माध्यम | अवधि |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | तांत्रिक ज्ञानाची चाचणी | ITI स्तर | 50 | 100 | मराठी आणि इंग्रजी | 60 मिनिटे |
| | **एकूण** | | **50** | **100** | | **60 मिनिटे** |

जोडारी, कनिष्ठ यांत्रिकी, तारतंत्री और यांत्रिकी या पदांकरिता परीक्षेचा अवधि 60 मिनिटे आहे व बाकी सर्व पदांच्या परीक्षेसाठी एकत्रित अवधि 120 मिनटांचा आहे, तरीसुद्धा उमेदवारास परीक्षास्थानी साधारणतः अनुक्रमे 180 मिनिटे/120 मिनिटे उपस्थित रहावे लागेल ज्यामध्ये नोंद होणे (logging in), प्रवेशपत्र गोळा करणे, सूचना देणे इ. साठी लागणा-या कालावधीचासुद्धा समावेश आहे. इंग्रजी व मराठी प्रश्नावली व्यतिरिक्त सर्व प्रश्नावल्या मराठी आणि इंग्रजी भाषेत असतील. दिलेल्या 120 मिनिटांच्या कालावधीत उमेदवार कोणत्याही प्रश्नावलीतील कोणताही प्रश्न सोडवू शकतात. सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या पाच उत्तरांपैकी, फक्त एकच अचूक उत्तर असेल. **उमेदवारास सर्वाधिक अचूक उत्तराची निवड करावयाची आहे आणि उमेदवारास वाटत असलेल्या योग्य/अचूक पर्यायावर 'माउस-क्लिक' करावयाचा आहे. उमेदवाराने क्लिक केलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास उमेदवाराचे त्या प्रश्नाचे उत्तर म्हणून गणले जाईल. उमेदवाराने दर्शविलेल्या चुकीच्या उत्तरासाठी कोणताही दंड नाही. परंतु उमेदवाराने कोणत्याही प्रश्नाचे उत्तर अंदाजाने देऊ नये असा सल्ला दिला जातो.**

**कृपया ध्यानात घ्या की या पुस्तिकेत दिलेले प्रश्नांचे प्रकार हे उदाहरणादाखल आहेत आणि सर्वसमावेशक नाहीत. प्रत्यक्ष परीक्षेत तुम्हाला यापैकी काही किंवा सर्व प्रकारांचे अधिक काठीण्य पातळीचे प्रश्न आढळतील, शिवाय या ठिकाणी नमूद न केलेल्या इतर प्रकारांवरही प्रश्न आढळतील.**

काही नमुना प्रश्न खाली दिले आहेत.

# नमुना प्रश्न

## मराठी भाषा

**प्र.1-2.** पुढील प्रत्येक प्रश्नात वाक्याचे चार भाग पाडले आहेत. व्याकरणाच्या, वाक्य रचनेच्या किवा भाषेच्या दृष्टीने वाक्य सदोष असल्यास, कोणत्या भागात दोष आहे ते ठरवून त्या भागाचा क्रमांक उत्तर म्हणून द्या. वाक्य निर्दोष / बिनचूक असल्यास उत्तर "(5)" द्या.

**प्र.1.** इंग्लंडमधून जन्मलेल्या (1) / कुसुमाग्रजांना शेक्सपियर म्हणतात (2) / व हिंदुस्थानात जन्मलेल्या शेक्सपियरांना (3) / कुसुमाग्रज म्हणतात (4)    निर्दोष (5)

**प्र.2.** माझ्या स्मरणशक्तीनुसार (1) / माझ्या बाळपणी माझ्या वडिलांची बदली (2) / एका गलिच्छ गावी (3) / झाली आहे. (4)    निर्दोष (5)

**प्र.3-4.** पुढे काही शब्दसमूह दिले आहेत. त्यांचा अर्थ सांगणारा एक शब्द दिलेल्या पर्यायातून निवडा.

प्र.3. स्वतःच स्वतःची सर्व कामे करणारा.

(1) स्वयंभू (2) स्वावलंबी (3) स्वयंचलित (4) स्वकष्टार्जित (5) स्वाध्यायी

प्र.4. कोणतेही काम करू शकणारा.

(1) बहुश्रुत (2) हुषार (3) चलाख (4) हरहुन्नरी (5) डोकेबाज

## ENGLISH LANGUAGE

**Q.1.** Read the sentence to find out whether there is any grammatical or idiomatic error in it. The error, if any, will be in one part of the sentence. That part is the answer. If there is no error, the answer is 'No error'. (Ignore the errors of punctuation, if any).

The regaining of freedom (1) / as we well know has given rise for (2) / many dormant issues (3) / and conflicts in our society. (4) No error (5)

**Q.2-3. Directions :** In each of the following questions, select from amongst the five alternatives, the word most opposite in meaning of the word given in capitals.

**Q.2.** LIVELY

(1) simple (2) weak (3) dull (4) angry (5) moron

**Q.3.** INADVERTENT

(1) adequate (2) available (3) sluggish (4) negligent (5) intentional

**Q.4.** Pick out from the words given below this sentence the word which would complete the sentence correctly and meaningfully.

He wants me to look _____ his garden during his absence.

(1) at (2) over (3) after (4) into (5) from

**Q.5-6. Direction :** In each of the following questions, select from amongst the five alternatives, the word nearest in meaning to the word given in capitals.

**Q.5.** LETHAL

(1) light (2) dangerous (3) deadly (4) cruel (5) thoughtless

**Q.6.** CENTENARY

(1) a guard (2) a hundred years (3) a very old man (4) a hundred runs (5) a hundredth anniversary

## सामान्य ज्ञान

प्र.1. कोणत्या देशाने क्रिकेट - विश्वचषक 2007 जिंकला ?

(1) दक्षिण आफ्रिका (2) श्रीलंका (3) इंग्लंड (4) न्यूझिलंड (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरिक्त अन्य

प्र.2. महाराष्ट्रात खालील पैकी कोणते पीक घेतले जात नाही ?

(1) ज्वारी (2) गहू (3) ज्यूट (4) कापूस (5) तंबाखू

प्र.3. महाराष्ट्रात खालीलपैकी कोणत्या शहरात कुंभमेळा भरतो ?

(1) पुणे (2) रत्नागिरी (3) नाशिक (4) पंढरपूर (5) कोल्हापूर

प्र.4. अवैध पैशाविरूद्धच्या लढाईमध्ये खालीलपैकी कोणत्या वित्तीय संस्थेने 'आपल्या ग्राहकांना जाणा' (Know Your Customer) योजनेची सुरूवात केली ?

(1) आई डी बी आई (2) आर बी आय (3) नाबार्ड (4) सीडबी (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरिक्त अन्य

प्र.5. खालीलपैकी कोणत्या राज्याची सीमारेषा महाराष्ट्राच्या सीमारेषेशी लागून नाही ?

(1) छत्तीसगढ़ (2) कर्नाटक (3) आन्ध्र प्रदेश (4) राजस्थान (5) गुजरात

## तर्कशक्ती आणि गणितीय क्षमता

प्र.1. 'पायाचा', मनुष्याशी जो संबंध आहे तसाच संबंध 'खूर' चा खालीलपैकी कशाशी आहे ?

(1) घोडा (2) कुत्रा (3) बूट (4) लोहार (5) खोगीर

**प्र. 2.** खालीलपैकी कोणत्या खर्चाच्या शीर्षकांतर्गत ‘मुलांच्या मासिकाची वर्गणी भरली’ ही क्रिया वर्गीकृत होईल ?

(1) अन्न (2) प्रवास (3) आतिथ्य (4) आरोग्य (5) शिक्षण

**प्र.3.** मुलांच्या एका रांगेत महेश रांगेच्या डावीकडून सातवा आणि उजवीकडून अठरावा आहे. त्या रांगेत एकूण किती मुले आहेत?

(1) 26 (2) 25 (3) 27 (4) निश्चित सांगता येत नाही (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरीक्त अन्य

**प्र.4.** खालील इंग्रजी वर्णाक्षरगटाच्या श्रृंखले मध्ये प्रश्नचिह्नाच्या (?) जागी दिलेल्या इंग्रजी वर्णाक्षरगटांपैकी कोणता गट येईल ?

AB BC CD DE ? FG

(1) DF (2) DG (3) FE (4) EF (5) GF

**प्र.5.** एका सांकेतिक परिभाषेत ‘A + B’ चा अर्थ ‘B ची आई A आहे ’ असा आहे आणि ‘A – B’ चा अर्थ ‘B चे वडील A आहेत’ असा आहे. खालीलपैकी कशाचा अर्थ ‘R ची आजी P आहे ’ असा होईल ?

(1) P – Q + R (2) Q – R + P (3) P + Q – R (4) Q + R – P (5) दिलेल्या पर्यायांव्यतिरीक्त अन्य

## <u>तांत्रिक ज्ञानाची चाचणी</u>

या विषयावरील प्रश्न त्या-त्या विशिष्ट क्षेत्राच्या ज्ञानासंबंधित असतील.

**(अ) ऑन-लाईन परीक्षेच्या स्वरूपाबद्दलचे तपशील :**

(1) परीक्षा ऑन-लाईन म्हणजेच संगणकावर घेतली जाईल.

(2) प्रश्नावल्या विविध पदानुसार मराठी/इंग्रजी/ द्विभाषी असतील.

(3) सर्व प्रश्नांना बहुपर्याय असतील. प्रश्नासाठीच्या पाच उत्तरांपैकी केवळ एकच अचूक उत्तर असेल. **परीक्षार्थीला सर्वाधिक उचित उत्तराची निवड करावयाची असून जो पर्याय उचित/अचूक वाटतोय त्या पर्यायावर ‘माउस-क्लिक’ करावयाचे आहे. ‘क्लिक’ केला गेलेला पर्याय ठळकपणे दर्शविला जाईल आणि त्यास प्रश्नाचे उत्तर म्हणून गणले जाईल. एखाद्या प्रश्नाच्या उत्तरास अंतिम मुल्यांकनासाठी तेव्हाच विचारात घेतले जाईल जेव्हा उमेदवाराने ‘Save & Next’ वर किंवा ‘Mark for Review & Next’ वर क्लिक करुन उत्तर दिले असेल.**

(4) सर्वर मध्ये घड्याळ लावलेले आहे आणि तुमच्या संगणकाच्या पटलाच्या वरच्या उजव्या कोप-यातील ऊर्वरीत वेळ दर्शविणारा टाईमर परीक्षा पूर्ण करण्यासाठी शिल्लक राहिलेली वेळ दर्शवेल. जेव्हा घड्याळाची वेळ संपेल तेव्हा परीक्षा आपोआप बंद होईल. तुम्हाला स्वतःहून परीक्षा संपवण्याची किंवा थांबवण्याची आवश्यकता नाही.

(5) स्क्रीनच्या उजव्या बाजूला Question पॅलेट दाखवले जाणार असून ते खालील पैकी एक चिन्ह वापरुन प्रत्येक प्रश्नाची स्थिती दाखवेल :



**तुम्ही अजून ह्या प्रश्नापर्यंत पोहोचला नाहीत.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शवले नाही.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले नाही, परंतु ह्या प्रश्नाच्या पडताळणीसाठी खूण केली आहे.**



**तुम्ही ह्या प्रश्नाचे उत्तर दर्शविले आहे, परंतु पडताळणीसाठी त्यावर खूण केली आहे.**

पडताळणीसाठी खूण केल्याची’ स्थिती निव्वळ ह्याचे स्मरण देते की तुम्ही हा प्रश्न पुन्हा पाहण्याचे ठरवले आहे. “जर का पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर अंतिम मुल्यांकनामध्ये ते उत्तर गृहित धरले जाईल.”

(6) उत्तर दर्शवण्यासाठी प्रश्न निवडायचा असल्यास आपण खालीलपैकी एक करू शकता :

(a) थेट त्या क्रमांकाच्या प्रश्नाकडे जाण्यासाठी पटलाच्या उजवीकडील प्रश्न तालिकेमध्ये त्या क्रमांकाच्या प्रश्नावर क्लिक करा. ध्यानात घ्या की हा पर्याय निवडल्यास तुमचे चालू प्रश्नाला दर्शविलेले उत्तर सुरक्षित केले जात **नाही.**

(b) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी ‘Save and Next’ वर क्लिक करा आणि क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(c) चालू प्रश्नाचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी व पडताळणी साठी खूण करण्यासाठी ‘Mark for Review and Next’ वर क्लिक करा क्रमाने पुढच्या प्रश्नाकडे जा.

(7) तुमचे उत्तर निवडण्यासाठी दिलेल्या पर्याय बटनांपैकी एका पर्याय बटनावर क्लिक करा.

(8) तुमचे उत्तर बदलण्यासाठी दुस-या अपेक्षित पर्याय बटनावर क्लिक करा.

(9) तुमचे उत्तर सुरक्षित करण्यासाठी तुम्हाला **'Save and Next'** वर क्लिक **करावेच** लागेल.

(10) निवडलेले उत्तर वगळण्यासाठी त्या निवडलेल्या पर्यायावर पुन्हा क्लिक करा किंवा **'Clear Response'** बटनावर क्लिक करा.

(11) एखाद्या प्रश्नावर पडताळणीसाठी खूण करावयाची असल्यास **'Mark for Review & Next'** वर क्लिक करा. "जर का पडताळणीसाठी खूण केलेल्या प्रश्नाचे उत्तर दर्शविलेले असेल तर ते उत्तर अंतिम मूल्यांकनामध्ये धरले जाईल."

(12) एखाद्या प्रश्नाचे उत्तर बदलण्यासाठी प्रथम प्रश्न निवडा, त्यानंतर नवीन उत्तर पर्यायावर क्लिक करा आणि नंतर **'Save and Next'** बटनावर क्लिक करा.

**(13) सुरक्षित केलेले प्रश्न किंवा उत्तर दर्शवल्यानंतर पडताळणीसाठी खूण केलेले प्रश्नच केवळ मुल्यांकनासाठी विचारात घेतले जातील.**

(14) ह्या प्रश्नपत्रिकेमधील विभाग पटलाच्या (Screen) वरच्या पट्टिकेवर (Bar) दर्शवले आहेत. एखाद्या विभागातील प्रश्न त्या विभागाच्या नावावर क्लिक करून पाहता येतील. तुम्ही जो विभाग पाहत आहात तो ठळकपणे दर्शविला आहे.

(15) एखाद्या विभागातील अंतिम प्रश्नासाठी **'Save and Next'** बटनावर क्लिक केल्यानंतर आपण आपोआप पुढच्या विभागाच्या पहिल्या प्रश्नाकडे जाल.

(16) एखाद्या विभागातील प्रश्नांची स्थिती पाहण्यासाठी आपण माऊस कर्सर (mouse cursor) त्या विभागाच्या नावावर नेऊ शकता.

(17) दिलेल्या 120 मिनिटांच्या कालावधीत उमेदवार कोणत्याही प्रश्नावलीतील कोणताही प्रश्न सोडवू शकतात.

(18) परीक्षार्थींना 'परीक्षा प्रशासकाच्या' सूचनांचे काळजीपूर्वक पालन करण्याची विनंती आहे. जर का एखादा परीक्षार्थी सूचनांचे/नियमांचे पालन करीत नसेल, तर तो गैरवर्तणुकीचा/अप्रामाणिक मार्गाच्या अंगिकाराचा प्रकार गणला जाईल आणि असा परीक्षार्थी विभागाने ठरविलेल्या कालावधीसाठी परीक्षांना बसण्यास अपात्र ठरला जाईल.

(19) केवळ परीक्षा प्रारंभ होण्यापूर्वी परीक्षार्थी परीक्षा प्रशासकांना त्यांच्या शंका किंवा प्रश्न विचारू शकतात. परीक्षा प्रारंभ झाल्यानंतर कोणत्याही शंकेचे समाधान केले जाणार नाही.

(20) 120 मिनिटे संपल्यानंतर परीक्षार्थींना एकही प्रश्न सोडवता येणार नाही किंवा त्यांच्या उत्तरांची पडताळणी करता येणार नाही. जरी परीक्षार्थीने 'submit' बटन क्लिक केले नसले तरीही त्याच्या/तिच्या उत्तरांना संगणक प्रणाली आपोआप सुरक्षित (Save) करेल.

**(21) कृपया लक्षात घ्या-**

**(1) प्रत्यक्ष परिक्षेची वेळ संपल्याशिवाय परीक्षार्थींना पेपर 'अंतिमतः सबमिट' (finally submit) करू दिले जाणार नाही.**

**(2) एकदा परीक्षा प्रारंभ झाली की कोणत्याही परिस्थितीत परीक्षार्थीने की-बोर्ड ची कोणतीही key क्लिक करावयाची नाही, कारण त्यामुळे परीक्षाच बंद होईल**

## (ब) सर्वसामान्य सूचनाः

(1) कृपया प्रवेशपत्रावर दर्शविलेले दिनांक, रिपोर्टिंग वेळ आणि परीक्षास्थळाचा पत्ता याची नीट दखल घ्या.

(2) तुम्ही ऑनलाईन परीक्षेच्या स्थानाची निश्चिती करण्यासाठी एक दिवस अगोदर परीक्षास्थानी जावे, जेणेकरून परीक्षेच्या दिवशी तुम्ही तिथे वेळेवर (प्रवेश पत्रावर छापलेल्या) पोहोचू शकाल. उशीरा येणा-यांना प्रवेश नाही.

(3) तुमचा नवीनतम फोटोग्राफ चिकटवलेले प्रवेशपत्र तुम्हाला परीक्षा स्थानी आणावयाचे आहे. (शक्यतो तोच फोटो जो तुम्ही अपलोड केला)

(4) परीक्षास्थानी तुम्हाला परीक्षा प्रशासक आणि विभागाचे प्रतिनिधि यांच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावयाचे आहे. जर तुम्ही सूचनांचे उल्लंघन कराल तर तुम्हाला अपात्र गणले जाईल आणि परीक्षास्थान सोडून जाण्यास सांगितले जाईल.

(5) गणकयंत्र (स्वतंत्र किंवा घडयाळासह), पुस्तके, वह्या किंवा लिखित कागद, सेलफोन (कॅमेरा सुविधेसह/शिवाय) किंवा इतर कोणतेही इलेक्ट्रॉनिक यंत्र (उपकरण) यांचा वापर परीक्षेच्या कालावधीत करू दिला जाणार नाही. परीक्षेच्या वेळी प्रतिबंधित साहित्य उमेदवारांकडे आढळून आल्यास त्याची/तिची उमेदवारी रद्द केली जाईल तसेच उमेदवाराविरूद्ध फौजदारी कार्रवाई केली जाईल.

(6) कृपया आपल्या सोबत नवीनतम फोटो चिकटवलेले हे प्रवेशपत्र आणि सध्या वैध, मूळ स्वरुपातील फोटो ओळख पत्र (जसे की, स्वतःचे आधार कार्ड/ई-आधार कार्ड/पॅन कार्ड/पारपत्र/वाहन चालक परवाना/निवडणूक आयोगाचे ओळखपत्र) आणावे. कृपया आपण आपले प्रवेशपत्र व त्यासोबत फोटो ओळख पत्राची प्रत (झेरॉक्स) जोडून ते पर्यवेक्षकाकडे सुपूर्द करावे. आवेदन पत्रावर असणारे नाव (ऑनलाइन नोंदणीच्या वेळी जे उमेदवाराने दिलेले असते) फोटो- ओळख पत्रावरील नावाशी तंतोतंत जुळावयास हवे. विवाहानंतर ज्या महिला उमेदवारांचे पहिले/मधले/अंतिम नाव बदलले आहे त्यांनी ह्याची खास दखल घ्यावी. जर आवेदन पत्रावरील आणि फोटो-परिचय पत्रावरील नावात काहीही फरक असेल तर अशा उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही. **कृपया लक्षात घ्या - रेशन कार्ड आणि वाहनचालक शिकाऊ परवाना या परिक्षेसाठी वैध ओळखीचा पुरावा म्हणून स्वीकारले जाणार नाही.** ज्या उमेदवारांनी आपल्या नावात बदल केला असेल, अशा उमेदवारांनी मूळ राजपत्रित अधिसूचना/ मूळ विवाह प्रमाणपत्र उपस्थित केले तरच त्यांना परिक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येईल.

(7) बायोमेट्रिक डाटा (अंगठयाचा ठसा) आणि फोटो परीक्षेच्या ठिकाणी परीक्षेच्या सुरवातीस घेतला जाईल. बायोमेट्रिक डाटा च्या सत्यता पडताळणीचा अंतिम निर्णय (जुळतो अथवा जुळत नाही) विभागाचा असेल व उमेदवारांना बंधनकारक असेल. बायोमैट्रिक डाटा परीक्षा दरम्यान कधीही घेण्यास/सत्यता पडताळणीस विरोध केल्यास उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल. या संदर्भात खालील मुद्दे लक्षात घ्याः

(क) जर बोटांवर कसलाही थर असेल (शाई/मेहंदी/रंग इत्यादी) तर धुवून टाका आणि परिक्षेच्या दिवसाआधी तो थर संपूर्णपणे गेला आहे याची खात्री करून घ्या.

(ख) जर बोटांना मळ किंवा धूळ लागली असेल तर बोटांचे ठसे (Finger prints) घेण्याआधी धुवून घ्या आणि हातांची बोटं सुकली आहेत याची खात्री करून घ्या.

(ग) दोन्ही हातांची बोट सुकलेली आहेत याची खात्री करा आणि जर बोट ओलसर असतील तर प्रत्येक बोट पूसा.

(घ) ठसा घेतल्या जाणा-या अंगठयाला जर जखम/मार लागला असेल तर त्वरित परिक्षा केंद्रावर संबंधित अधिका-यास कळवा.

(या मुद्यांचे पालन करण्यास असमर्थ ठरल्यास परिक्षेस बसु दिले जाणार नाही.)

(8) परीक्षेच्या ठिकाणी छायाचित्र आयरिस (IRIS) कॅप्चर केले जाईल. कॅप्चर केलेला फोटो उमेदवाराने अर्जात अपलोड केलेल्या फोटोशी जुळवला जाईल. तुम्ही अपलोड केलेल्या फोटोपेक्षा आपल्या दिसण्याच्या स्वरूपात कोणताही बदल करू नये. आयरिस (IRIS) डेटा सत्यता पडताळणीचा अंतिम निर्णय (जुळतो अथवा जुळत नाही) सत्यापन करणा-या अधिका-यांचा असेल व उमेदवारांना बंधनकारक असेल. कोणत्याही प्रसंगी IRIS स्कॅनिंग/पडताळणी प्रक्रियेत सहभागी होण्यास नकार दिल्यास उमेदवारी रद्द होऊ शकते. त्याच संदर्भात, कृपया खालील गोष्टी लक्षात घ्याः

(अ) सर्व उमेदवारांसाठी डाव्या डोळ्याचे आयरिस (IRIS) कॅप्चर केले जाईल. (दृष्टीबाधित उमेदवार वगळता)

(आ) उमेदवारांनी IRIS कॅप्चर करताना कॉन्टॅक्ट लेन्स आणि चष्मा काढावा. उमेदवारांनी कॉन्टॅक्ट लेन्स घालणे टाळावे आणि चष्मा वापरण्यास प्राधान्य द्यावे.

(इ) IRIS स्कॅनिंगमध्ये कोणताही स्पर्श गुंतलेला नाही. स्कॅनर आणि डोळा यामध्ये अर्धा फूट अंतर राखले जाईल.

या मुद्यांचे पालन करण्यास असमर्थ ठरल्यास परिक्षेस बसु दिले जाणार नाही.

(9) फ्रिस्किंगमध्ये वेळ वाचविण्यासाठी (मेटल डिटेक्टरचा वापर केला जाईल) उमेदवारांना खालील ड्रेस कोडचे पालन करण्याचा सल्ला दिला जात आहेः

- हलके कपडे जे कोणतीही साधने किंवा संपर्काची उपकरणे लपविण्यासाठी वापरले जाऊ शकत नाही.
- अर्धी बाही असलेले कपडे पण त्यावर कोणतीही मोठी बटणे, बॅजेस, ब्रुचेस इ. नसावीत ज्यांचा वापर संपर्क साधन, ब्लूटूथ, कॅमेरा इ. लपविण्यासाठी केला जाऊ शकेल.
- स्लीपर/सँडल वापरावे आणि बूट/मोजे टाळावे.
- धातूचे बटन, चेन इ. नसलेले हलके कपडे वापरावेत.
- पारंपारिक / धार्मिक पोशाख घालून येणा-या उमेदवारांनी आणि दिव्यांग उमेदवारांनी फ्रिस्किंग साठी रिपोर्टिंगच्या वेळेपूर्वी अगोदरच केंद्रावर उपस्थित व्हावे.

(10) तुम्ही दिलेल्या उत्तरांचे इतर परीक्षार्थीच्या उत्तरांबरोबर उत्तरांच्या सारखेपणासाठी विश्लेषण केले जाईल. यासाठी अवलंब केलेल्या विश्लेषण प्रक्रियेतून जर उत्तरांची अदलाबदल केल्याचा व तुम्ही प्राप्त केलेले गुण वैध नसल्याचा निष्कर्ष आल्यास तुमची उमेदवारी रद्द केली जाऊ शकते. कोणीही परीक्षार्थी जर कॉपी करताना, सहाय्य घेताना किंवा देताना, किंवा परीक्षार्थीस न शोभणारी गैरवर्तणूक करताना आढळला तर त्याच्या उत्तरांची तपासणी केली जाणार नाही. विभाग अशा परीक्षार्थीविरूद्ध योग्य ती कारवाई करेल.

(11) तुम्ही स्वतः सोबत एक बॉल पॉईंट पेन आणावे. तुम्ही स्वतःसोबत एक स्टॅंप इंक पॅड (नीळे/काळे) आणू शकता. एक कागद तुम्हाला दिला जाईल ज्यावर तुम्ही कच्चे काम करू शकता किंवा उत्तर निवडण्यापूर्वी पुन्हा एकदा पडताळणी करावयाच्या प्रश्नांचे क्रमांक लिहू शकता. परीक्षा संपल्यावर कच्चे काम केलेले कागद प्रवेशपत्रासह पर्यवेक्षकाकडे हस्तांतरित करावीत.

(12) परीक्षेच्या व्यवस्थेमध्ये काही व्यत्यय येण्याची शक्यता पूर्णतः नाकारण्यात येणार नाही; ज्याचा परिणाम चाचणी वितरणावर आणि/किंवा निकाल तयार करण्यावर होऊ शकतो. अशा प्रसंगी असे व्यत्यय सुधारण्याचा पूर्णतः प्रयत्न केला जाईल, ज्यामध्ये उमेदवारांना एका जागेहून दुस-या जागेत हलविणे किंवा परीक्षेस विलंब होणे गृहित आहे. पुन्हा परीक्षा घेणे या बाबतचा निर्णय हा परीक्षा घेणा-या संस्थेचा/मंडळाचा निर्णय अंतिम असेल. उमेदवार पुन्हा परीक्षेसाठी कोणताही दावा करु शकणार नाही. ह्या विलंब झालेल्या प्रक्रीयेस उमेदवार जर हलण्यास तयार नसेल किंवा परीक्षा प्रक्रियेत भाग घेण्यास तयार नसेल अशा उमेदवारांना प्रक्रियेमधून संपूर्णपणे वगळण्यात येईल.

(13) परीक्षेची सामग्री तथा त्याबद्दलची कोणतीही अन्य माहिती, संपूर्ण किंवा भागांमधे उघड करणे, प्रकाशित करणे, पुन्हाः निर्माण करणे, ट्रासमिट करणे, जमा करणे किंवा प्रसारण आणि जमा करणारे किंवा परिक्षाकेंद्रा मधे दिला जाणारा कागद घेऊन जाणारे, किंवा परीक्षेच्या सामग्रीचा बेकायदेशीर बाळगण्यांवर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.

(14) भरती करण्याच्या कोणत्याही प्रक्रियेतील कोणत्याही भागामध्ये, परिक्षार्थी द्वारा खोटी माहिती देणे/किंवा प्रक्रियेच्या नियमांचे उल्लंघन करण्याबाबतीत, परिक्षार्थीस भरती प्रक्रियेमध्ये अपात्र घोषित केले जाईल आणि भविष्यात विभागातर्फे कोणत्याही भरती प्रक्रियेमध्ये भाग घेण्याची परवानगी दिली जाणार नाही. जर ह्या बाबतीत चालू असलेल्या प्रक्रियेमध्ये निदर्शनास आले नाही परंतु नंतर कधी लक्षात आल्यास त्याला प्रक्रियेच्या पहिल्या भागापासूनच अपात्र ठरविण्यात येईल.

(15) ज्या दिव्यांग उमेदवारांनी जिल्हा परिषदेकडे लेखनिकाची मागणी केली आहे, त्याच उमेदवारांना जिल्हा परिषदेतर्फे लेखनिक उपलब्ध करुन दिला जाईल. अशा सर्व उमेदवारांना प्रवेशपत्रासोबत सक्षम वैद्यकीय अधिका-याचे प्रमाणपत्र (जाहिरातीमधील परिशिष्ट-1) सादर करणे बंधनकारक राहील. उमेदवारांना स्वतःचा लेखनिक आणण्याची परवानगी असणार नाही.

(16) परीक्षेसाठीची Mock Link जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(17) कृपया सामाजिक अंतर संबंधी खाली दिलेल्या सूचना वाचा.

## सामाजिक अंतर संबंधी सूचना

1. उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश पत्रात दिलेल्या वेळेनुसार उपस्थित रहायचे आहे. उशीरा येणा-या उमेदवारास परीक्षेस बसू दिले जाणार नाही.
2. उमेदवारांचे परीक्षा अनुक्रमांक व लॅब क्रमांक परीक्षा केंद्राच्या बाहेर दर्शविले जाणार नाही, प्रत्येक उमेदवारास परीक्षा केंद्रावर प्रवेश करते वेळी यासंबंधी माहिती दिली जाईल.
3. परीक्षा केंद्रावर उमेदवारास आवश्यक लागणारे सामान

   **परीक्षा केंद्रावर उमेदवारास केवळ खालील सामान आणण्याची परवानगी असेल:**

   **अ. मास्क**

   **ब. स्वतःचे हँड सॅनिटाइज़र (50 मिली.)**

   **क. एक सामान्य पेन आणि स्टँप इंक पॅड (नीळे अथवा काळे)**

   **ड. परीक्षा संबंधी कागदपत्रे (प्रवेश पत्र तसेच ID कार्डची प्रत जोडलेले प्रवेश पत्र, सत्यता तपासण्यासाठी मूळ ID कार्ड)**

   **इ. लेखनीक (स्क्राइब) वापरणा-या उमेदवारांसाठी - व्यवस्थितरीत्या लिहिलेला व हस्ताक्षर केलेला स्क्राइब फॉर्म तसेच परिशिष्ट 1**

   **परीक्षा केंद्राच्या आत अन्य कोणतेही सामान नेण्याची परवानगी नसेल.**
4. उमेदवाराने आपले कुठलेही साधन/सामग्री इतरांना वापरण्यास देऊ नये.
5. उमेदवारांनी अन्य उमेदवारांसोबत सामाजिक अंतर राखणे गरजेचे आहे.
6. उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सांगितलेल्या सूचनेनुसार रांगेत उभे राहावे.
7. उमेदवार जर लेखनीकाच्या सुविधेचा लाभ घेणार असेल तर लेखनीकाला सुद्धा स्वतःचा मास्क आणावा लागेल.
8. परीक्षा संपल्यावर उमेदवारांनी परीक्षा स्थळावरील स्टाफ द्वारा केलेल्या सूचनेनुसार गर्दी न करता व्यवस्थितरीत्या केंद्राबाहेर पडायचे आहे.

## आपणांस शुभेच्छा!